# THE INDIAN LINK CHAIN MANUFACTURERS LIMITED

REGD OFFICE : SONAWALA BLDG., 2ND FLOOR, 59 , MUMBAI SAMACHAR MARG,
MUMBAI – 400023. PHONE :- 91-22-22661013 EMAIL : inlinch@hotmail.com
CIN No.: L28920MH1956PLC009882

---

Date: 02.07.2020

To,
BSE Limited
Department of Corporate Services
Phiroze Jeejeebhoy Tower,
Dalal Street,
Mumbai- 400001.

**Ref: The Indian Link Chain Manufacturers Limited (Security Code No.: (504746)**

**Sub: Newspaper publication of extract of approval of audited Financial Results for the quarter and year ended 31st March, 2020.**

Dear Sir,

Pursuant to the Regulation 30 of the SEBI (Listing Obligation and Disclosures Requirements) Regulation, 2015, please find attached herewith a copy of the newspaper publication of 'Extract of approval of audited Financial Results for the quarter and year ended 31st March, 2020' approved by the Board of Directors at its meeting held on Tuesday, June 30, 2020 and published in Financial Express on July 01, 2020 and in The Global Times on July 02, 2020.

You are requested to kindly take the same on record.

Thanking you,

Yours faithfully,

For The Indian Link Chain Manufacturers Limited

Sudhir Nevatia
Managing Director

# एसटीला आर्थिकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन

मुंबई : लॉकडाऊनमुळे एसटीची सेवा बंद आहे. त्यामुळे एसटी महामंडळाचे दररोज २२ कोटी रुपयाचे उत्पन्न बुडत आहे. एसटीच्या आर्थिक परिस्थितीमुळे मे महिन्याचे ५० टक्केच वेतन देण्यात आले. या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळास आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात यावे, यासह विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी बुधवारी राज्यव्यापी एसटी बचाव-कामगार बचाव आंदोलन महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेस (इंटक) संघटनेद्वारे करण्यात आले. बुधवारी वांद्रे येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर फिजिकल डिस्टन्सिंगचे पालन करून आंदोलन करण्यात आले. एसटी महामंडळास कोरोनाच्या पार्श्वभुमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबुत करण्याच्या हेतुने १ हजार कोटी रुपये अनुदान देण्यात यावे. मे महिन्याचा उर्वरीत ५० टक्के वेतन तात्काळ देण्यात यावे. जुन महिन्याचे वेतन निश्चित असलेल्या तारखेस देण्यात यावे. एसटी कर्मचा-यांना शासकिय कर्मचा-यांप्रमाणे वेतन देण्यात यावे, अशी मागणी संघटनेचे सरचिटणीस मुकेश तिगोटे यांनी केली आहे.

# एसटीला मालवाहतुकीचा आधार


मुंबई : लॉकडाऊन काळात एसटीचे प्रवासी उत्पन्न बंद झाले. त्यामुळे आधीच डबघाईला आलेली एसटी सेवा लॉकडाऊन काळात आर्थिक संकटात सापडली आहे. मात्र एसटीने मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे एसटीला माल वाहतुकीचा आधार मिळाला आहे. एसटीची मालवाहतूक मागील महिन्यापासून एसटीने सुरु केलेल्या मालवाहतुकीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. राज्य सरकारने १८ मे रोजी मालवाहतूक बसचा शुभारंभ रत्नागिरी येथून आंब्यांच्या पेट्या बोरिवलीला पाठवून करण्यात आला. त्यानंतर राज्याच्या विविध भागातून अन्नधान्य, बि-बियाणे, खते, भाजीपाला, कृषी उत्पादने यासोबत लोखंडी पाईप, रंगाचे डबे, अशा विविध प्रकारच्या मालाची वाहतूक मालवाहू एस.टीमधून केली जात आहे. नुकताच विठू माऊलीच्या दर्शनाला, आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला राज्यभरातील मानाच्या पालख्या निवडक वारकऱ्यांसह एसटीने दिमाखात पंढरी नगरीमध्ये गेल्या. देहू येथून संत तुकाराम, आळंदी येथून संत ज्ञानेश्वर, सासवड येथून संत चांगवटेश्वर व संत सोपानदेव, नेवासा येथून संत मुक्ताई , त्र्यंबकेश्वर येथून संत निवृत्तीनाथ पंढरपुरातुन संत नामदेव यांच्या पालख्या एसटीच्या शिवनेरी, शिवशाही,लालपरी अशा विविध बसमधून निवडक वारकरी बंधूंसह पंढरपूरकडे गेल्या.

## कोरोनाबाधितांना रुग्णालयात नेण्यासाठी

# खासगी रुग्णवाहिका, वाहने घेणार ताब्यात

### राज्य सरकारचा मोठा निर्णय






मुंबई - राज्यातील कोरोनाबाधीत रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी रुग्णवाहिका तसेच खासगी वाहने जिल्हा प्रशासनाने अधिग्रहीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत आज आरोग्य विभागामार्फत शासन निर्णय जाहीर केला आहे. अधिग्रहीत केलेले रुग्ण वाहक वाहन जास्त गंभीर नसलेल्या रुग्णांसाठी वापरण्यात येईल.

राज्यात कोरोनाच्या रुग्ण संख्येत वाढ होत असताना रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यासाठी रुग्णवाहिकांची आवश्यकता भासत आहे. त्यासाठी त्यांची संख्या वाढविण्याकरीता जिल्ह्यांमध्ये रुग्णालये, स्वयंसेवी संस्था यांच्याकडील रुग्णवाहिका उपलब्ध करून घेतानाचा गरज भासल्या, खासगी वाहन पुरवठादारांची वाहने देखील रुग्ण वाहक वाहन म्हणून वापर करण्याचा निर्णय झाला आहे.

कोरोना काळात खासगी रुग्णवाहिकांसाठी रुग्णांकडून अवाजवी दर आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी होत्या. त्याची दखल घेऊन खासगी रुग्णवाहिका आणि वाहने अधीग्रहीत करताना त्यांचा दर निश्चित करून ते उपलब्ध करून देण्यात येईल. २४ तास ह्या अधीग्रहीत केलेल्या रुग्णवाहिका आणि वाहने उपलब्ध राहतील. रुग्णवाहिका अधिग्रहीत करण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी (महापालिका क्षेत्र वगळता ) आणि महापालिका आयुक्त (महापालिका क्षेत्रात) राबवतील, असे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

प्रादेशिक परिवहन प्राधीकरणाने ठरवून दिलेल्या दरानुसार भाडे तत्वावरील वाहनांचे दर निश्चित करावे. त्यासाठी वाहनाचे भाडे, प्रत्यक्ष प्रवासाचे अंतर (किलोमीटर्स) याचा विचार करण्यात यावा असे या शासन निर्णयात म्हटले आहे.

या रुग्णवाहिका वाहन चालकासह, इंधनाच्या खर्चासह भाडे तत्वावर घेता येतील अथवा जेथे वाहन चालक उपलब्ध नसेल तेथे रुग्णवाहिका मासिक भाडेतत्वावर ताब्यात घेण्यात येतील. त्यांना स्थानिक परिवहन मंडळ, राज्य परिवहन, चालक पुरवठा कंपन्या, स्थानिक प्रशासनाकडील वाहनचालकांच्या सेवा अधीग्रहीत करून चालक उपलब्ध केले जातील. यारुग्णवाहिकांच्या इंधनाचा खर्च स्थानिक प्रशासनामार्फत केला जाईल.

लक्षणे नसलेल्या तसेच इतर रुग्णांसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने या अधीग३हीत केलेल्या वाहनांमध्ये किरकोळ बदल करून रुग्णवाहक वाहन म्हणून त्याचा वापर करावा व आवश्यकतेनुसार वाहने ताब्यात घ्यावीत, असे आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास यांनी शासन निर्णयात म्हटले आहे.

- जिल्हाधिकाऱ्यांनी अधीग्रहीत केलेल्या रुग्णवाहिका व वाहनांव्यतीरिक्त अन्य खासगी रुग्णवाहिका व वाहनांसाठी प्रादेशीक परिवहन प्राधीकरणामार्फत किमान दर निश्चित करण्यात यावा. या दरामप्रमाणे खासगी वाहनचालक आकारणी करीत आहेत हे तपासण्यासाठी तपासणी यंत्रणा तयार करण्यात येईल.


- जादा दर आकारणीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हाधिकारी व मनपा आयुक्त त्यांच्या कार्यक्षेत्रात यंत्रणा तयार करतील.

- अधीग्रहीत केलेली रुग्णवाहिका २४ तास उपलब्ध असेल

- रुग्णवाहिकेत स्मार्ट फोन, इंटरनेट सुविधा असेल. टोल फ्री १०८ रुग्णवाहिकेचे ॲप त्यात असेल ते या क्रमांकाच्या प्रणालीशी जोडले जाईल.

- रुग्णवाहिकेला संपर्कासाठी रुग्णांना १०८ क्रमांक किंवा स्थानिक प्रशासनाने सुरू केलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधता येईल.

# 'पांडुरंग सोबत आहेच, पण आरक्षणाचं बरं-वाईट झालं तर राज्य सरकार जबाबदार राहिल'



मुंबई - मराठा आरक्षणाची न्यायालयीन लढाई जिंकण्यासाठी महाविकास आघाडीच्या राज्य सरकारने भक्कम तयारी केल्याचे मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष व राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी म्हटले होते. मराठा आरक्षणाच्या न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करण्यासाठी स्थापन झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी हा ठाम विश्वास व्यक्त केला होता. मात्र, मराठा आरक्षणाबाबत राज्य सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी केला आहे.

सर्वोच्च न्यायालयात ७ जुलै रोजी मराठा आरक्षणाची सुनावणी आहे. मात्र, आरक्षण टिकवण्यासाठी राज्य सरकारच दुर्लक्ष आहे, कारण राज्य सरकारच्यावतीने दिल्लीत कोणत्याही ज्येष्ठ विधीतज्ज्ञांशी संपर्क झालेला नाही, असे पाटील यांनी म्हटले आहे. याशिवाय महाराष्ट्राचे मुख्य सरकारी वकील हे ३ महिन्यापासून मुंबईमध्ये आहेत, त्यांनी एखाद्या दिग्गज वकीलाशी संपर्क साधला का? राज्य सरकारच्या वतीने कोणते ज्येष्ठ वकील आरक्षण टिकवण्यासाठी बाजू मांडतील? सुनीवणीची काय तयारी केली? सर्व सरकारी वकीलांना योग्य कागदपत्र पोहोच केलेत का? कधी मीटिंग घेणार? या बाबत तातडीने खुलासा करावा, अशी मागणीही पाटील यांनी आपल्या फेसबुक पोस्टवरुन केली आहे.

समाजाच्या वतीने मी लढा देत आहे, मी माझ्या वतीने सर्व तयारी केली आहे. दिग्गज विधितज्ञ आपल्या बाजूने युक्तिवाद करतील. परंतु, शासनाचीसुद्धा जबाबदारी आहे, हे विसरू नये. पांडुरंग आपल्या सोबतच आहे, पण आरक्षणाचं काही बर वाईट झाल तर सरकार जबाबदार राहील, असे म्हणत महाविकास आघाडी सरकारवर अप्रत्यक्षपणे अविश्वासच पाटील यांनी दाखवला आहे.

दरम्यान, मराठा आरक्षणाच्या सर्वोच्च न्यायालयीन सुनावणीसाठी विधी विभाग व राज्य शासनाच्या वकिलांनी केलेल्या तयारीचा उपसमितीच्या बैठकीत सर्वंकष आढावा घेण्यात आला आहे. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने समोर आलेल्या इतर काही मुद्यांवरही चर्चा झाली. राज्य विधीमंडळात एकमताने मंजूर झालेल्या मराठा आरक्षण विधेयकाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी उपसमितीच्या सदस्यांनी काही सूचनादेखील मांडल्या आहेत. दरम्यान, येत्या ७ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाविरोधातील मूळ याचिका आणि पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील याचिकेवर सुनावणी होण्याची शक्यता आहे. या सुनावणीसाठी राज्य शासनाने आपली तयारी पूर्ण केलेली आहे. प्रख्यात विधीज्ञ मुकूल रोहतगी व इतर ज्येष्ठ वकिल महाराष्ट्र सरकारची बाजू मांडणार आहेत, असे अशोक चव्हाण यांनी सांगितले आहे.

# मुंबईतल्या पवई येथे इमारतीला लागलेल्या भीषण आगीवर अखेर नियंत्रण



मुंबई : मुंबईत आगीच्या घटना घडत असून, बुधवारी सकाळी सहा वाजता पवई येथे एका इमारतीला आग लागल्याची घटना घडली. डेल्फी असे या इमारतीचे नाव असून, पाचव्या माळयावर लागलेली आग सकाळी पावणे नऊ वाजता नियंत्रणात आली. चार फायर इंजिन आणि इतर साहित्याने आग आटोक्यात आणण्यात आली असून, येथील बहुतांशी साहित्य जळून खाक झाले. दरम्यान ही इमारत व्यावसायिक इमारत आहे.

दारुखाना येथील सिग्नल हिल ॲव्हेन्यू रोडवरील बॉम्बे टिंबर मार्टमध्ये शनिवारी दुपारी पावणे तीन वाजण्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. आगीची माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झालेल्या अग्निशमन दलाच्या जवानांनी ४ फायर इंजिन, ४ जम्बो टँकर्सच्या मदतीने आग शमविण्याचे काम हाती घेतले. दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास येथील आगीवर नियंत्रण मिळविण्यात आली आहे, अशी माहिती मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.

मुंबई शहर आणि उपनगरातील आगीचे सत्र अद्यापही सुरुच आहे. बुधवारी मध्यरात्री १२ वाजल्यापासून गुरुवारी दुपारी १२ वाजेपर्यंत मुंबई शहर आणि उपनगरात तब्बल ३ ठिकाणी आग लागल्याल्या घटना घडल्या. या तिन्ही आगीमध्ये मोठया प्रमाणावर वित्तहानी झाली असून, सुदैवाने मनुष्यहानी झालेली नाही. बुधवारी मध्यरात्री पावणे एकच्या सुमारास अंधेरी पूर्वेकडील नंदधाम इंडस्ट्रीयल इस्टेट, नरिमन पॉइंट येथील जॉली मेकर चेंबर २ येथे गुरुवारी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास आणि लोअर परळ येथील रघुवंशी मॉल कम्पाऊंड येथील पी २ इमारतीमध्ये गुरुवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास आग लागली होती.

# वीज पडून गाय ठार तर महिला किरकोळ जखमी

## रस्ता नसल्यामुळे 4 किलोमीटरचा प्रवास झोळीतून

जव्हारः जव्हार तालुक्याच्या सीमेवर असलेल्या चांभारशेत पैकी भुसार पाडा येथे मंगळवार दि.३०/०६/२० रोजी सायंकाळी ५:०० च्या सुमारास चंद्रकांत लक्ष्मण सापटा यांच्या घरावर वीज पडून एक गाय ठार झाली तर त्यांच्या पत्नी सुनिता चंद्रकांत सापटा यांना विजेचा कमी तीव्रतेचा धक्का लागला असल्याची घटना घडली आहे. सुनीताला जव्हार येथील कुटीर रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहे.

सायंकाळच्या सुमारास ढगाळ वातावरण झाले होते, विजेच्या कडकडाट सुरू होता, अचानक सापटा यांच्या घरावर 5 वाजेच्या दरम्यान वीज घरातील कौल फोडून गोठयात बांधलेल्या गायीवर पडली आणि गाय जागीच ठार झाली दरम्यान सुनीता ही घरातच होती, ती लांब असल्यामुळे सुदैवाने तिच्या पायाला किरकोळ दुखापत झाली, वीज गोठ्यात पडल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

भुसारपाडा हा गाव चांभारशेत पासून 4 किलोमीटर दूर असून तेथे जाण्यासाठी रस्ता नसल्याने जखमी महिलेच्या पायाला जखम झाल्यामुळे तिला चालत येत न्हवते, म्हणून गावकऱ्यांनी तिला झोळीत चांभारशेत येथे घेऊन आले, नंतर तिला वाहनात जव्हार येथे आणण्यात आले असून, तिच्यावर कुटिर रुग्णालयात उपचार सुरू असुन सायंकाळ पर्यंत तिला सोडले जाईल तसेच पंचनामा करण्यात आला असल्याची माहिती तलाठी बिराजदार यांनी दिली.

# प्रा.भीमराव खरात यांना 'आंबेडकरी योद्धा 'पुरस्कार जाहीर



कल्याण (प्रतिनिधी) प्रतिबिंब सामाजिक सांस्कृतिक संस्था (रजि.)ही सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात राज्यस्तरावर काम करणारी संस्था आहे. या संस्थेचा वर्धापन दिन लोकडाऊन संपल्या नंतर थाटात साजरा होणार आहे संस्थेच्या दिमाखदार वर्धापन दिन सोहळयात फुले शाहू आंबेडकरी विचार धारेवर काम करून आंबेडकरी चळवळीत भरीव योगदान देणारे प्रा. भीमराव खरात यांना ₹आंबेडकरी योद्धा ₹ या पुरस्काराने सन्मानित करणार असल्याचे संस्थेचे सल्लागार मिलिंद वानखेडे, संस्थेचे अध्यक्ष सुनील वानखेडे, संस्थेचे उपसचिव अमर रणधुमाळ यांनी माध्यमांशी बोलतांना जाहीर केले.

आंबेडकरी समाजातील बहुतांशी सुशिक्षित वर्ग मोठ्या पगाराच्या नोकरीत रुजू झाल्या नंतर आपल्या कुटुंबाला सोडून सामाजिक कार्यात सहभागी होत नाही व आंबेडकरी चळवळीपासून दूर जातात परंतु प्रा भीमराव खरात हे एका महाविद्यालयात प्राध्यापक असून सुद्धा यांचे आंबेडकरी चळवळीपासून दूर न जाता आंबेडकरी चळवळीत अधिक सक्रिय झाले त्यांनी सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन प्रा. खरात यांना आंबेडकरी योद्धा हा पुरस्कार जाहीर करण्यात आला प्रा खरात यांचा २ जुलै रोजी वाढदिवस आहे त्यांच्या वाढदिवसाच्या पूर्व संध्येला हा पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्या मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे या पुरस्काराने माझी जबाबदारी वाढली असे मत खरात यांनी व्यक्त केले.

## दी इंडियन लिंक चेन मॅन्यूफॅक्चरर्स लि.

नोंदणीकृत कार्यालय - ५९,सोनावाला बिल्डिंग, २ रा मजला, मुंबई समाचार मार्ग, मुंबई - ४०० ०२३.
दूर. क्र. ०२२ - २२६६१०१३ ई-मेल : inlinch@hotmail.com
वेबसाइट : www.inlich.com सीआयएन नं. : L228920MH1956PLC009882

### दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताचे लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष

रु. लाखांत

| अ. क्र. | तपशील | तिमाहीअखेर | | | वर्षअखेर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | लेखापरीक्षित ३१.०३.२०२० | अलेखापरीक्षित ३१.१२.२०१९ | लेखापरीक्षित ३१.०३.२०१९ | लेखापरीक्षित ३१.०३.२०२० | लेखापरीक्षित ३१.०३.२०१९ |
| १. | परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | १४.४८ | २९.५८ | ७.४१ | ७८.२६ | ४१.९३ |
| २. | कालावधीकरिता (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपूर्व) निव्वळ नफा (+)/तोटा(-) | (९.७९) | (८.८९) | (१०.१३) | (३५.७२) | -२७.८३ |
| ३. | करपूर्व कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) निव्वळ नफा (+)/तोटा(-) | (९.७९) | (८.८९) | (१०.१३) | (३५.७२) | ८८.३४ |
| ४. | करपश्चात कालावधीकरिता (अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) निव्वळ नफा (+)/तोटा(-) | (९.७९) | (८.८९) | (६.८३) | (३५.७२) | ४७.८९ |
| ५. | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात नफा/तोटा व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश) | (९.७९) | (८.८९) | (६.८३) | (३५.७२) | ४७.८९ |
| ६. | प्रदानित समभाग भांडवल (प्रतिशेअर रु. १००/- दर्शनी मूल्य) | ५०.०० | ५०.०० | ५०.०० | ५०.०० | ५०.०० |
| ७. | गत वर्षीच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) | - | - | | | |
| ८. | उत्पन्न प्रतिशेअर | | | | | |
| अ) | मूलभूत रु. | (१९.५८) | (१७.७८) | (१३.६६) | (७१.४४) | ९५.७८ |
| ब) | सौम्यीकृत | (१९.५८) | (१७.७८) | (१३.६६) | (७१.४४) | ९५.७८ |

टीप :
१. दि. ३१.०३.२०२० रोजी संपलेली तिमाहीकरिता व कालावधीकरिताच्या कंपनीच्या लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संचालक मंडळाच्या लेखापरीक्षण समिती्दवारे पुनरावलोकन करण्यात आले असून संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ३०.०६.२०२०रोजी पार पडलेल्या सभेत त्यांना मंजुरी देण्यात आली आहे.
२. लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष हे भारतीय लेखा मानके (आयएनडी एएस), कंपन्या कायदा, २०१३ (कायदा) च्या तरतुदी लागू असल्यानुसार तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळाद्वारे (सेबी) जारी मार्गदर्शक सूचनांनुसार तयार करण्यात आले आहेत.
३. कंपनीने दि. ०१.०४.२०१९ पासून प्रभावी स्वरूपात आयएनडी एएस चा स्वीकार केला आहे. आयएनडी एएस १६ च्या स्वीकाराचा वित्तीय निष्कर्षांवर किरकोळ प्रभाव आहे.
४. कंपनी चेन्स व केमिकल्सच्या व्यवसायात कार्यरत आहे. व्यवस्थापनाच्या दृष्टीने, सदर उत्पादनांच्या व्यापारातील जोखीम व परतावा वेगवेगळा नाही. त्यामुळे विभागीय नोंदीची घोषणा त्याकिता आवश्यक नाही.
५. गत तिमाही/वर्षाकरिताची अनुषंगिक आकडेवारी आवश्यकतेनुसार तुलनायोग्य बनवण्यासाठी पुनर्गठीत, पुनःनमूद व पुनःवर्गीकृत करण्यात आली आहे.
६. गत वर्षीची अपवादात्मक बाबी ही बी/१२०४, अशोक गार्डन को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, ठोकरसी जीवराज मार्ग, शिवडी, मुंबई - ४०० ०१५ येथील फ्लॅटच्या विक्रीवरील नफा (तोटा) दर्शविते.
७. दि. ३१.०३.२०२० व दि. ३१.०३.२०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिताची आकडेवारी ही संपूर्ण वित्तीय वर्षाची लेखापरीक्षित आकडेवारी व संबंधित वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतच्या पुनरावलोकन केलेल्या वर्ष ते तारीख आकडेवारीदरम्यान ताळमेळ साधणारी आकडेवारी आहे.
८. स्वीकारार्ह बाबींवरील रकमांवरील कोव्हीड १९ च्या उद्रेकाच्या परिणामाच्या निर्धारणांवर विचार तकरता सदर घटकाच्या व्यवस्थापन अशा निर्णयाप्रत आले आहे की सदर बाबीचा विद्यमान वित्तीय वर्षावर प्रभाव नसल्याने वित्तीय निष्कर्षांमध्ये कोणतीही तडजोड करण्याची आवश्यकता नाही. तसेच विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना अजूनही लागू असल्याने अत्यंत अनिश्चित आर्थिक वातावरण निर्माण होत आहे. अशा परिस्थितीमुळे व्यवस्थापनाचे विद्यमान कालावधीवरील प्रभावाचे निर्धारण हे आगामी कालावधीत परिस्थिती सुधारण्यावर अवलंबून असेल.

दी इंडियन लिंक चेन मॅन्यूफॅक्चरर्स लि.करिता
सही/-
पी. के. नेवाटिया
अध्यक्ष

ठिकाण - मुंबई
दिनांक - ३०.०६.२०२०

# महाविद्यालयांमध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये होणार रेन वॉटर हार्वेस्टिंग



मुंबई : मार्च ते मे या महिन्यांमध्ये देशाच्या विविध भागामध्ये निर्माण होणाऱ्या दुष्काळी परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशातील सर्व विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्न कॉलेज, शैक्षणिक संस्था यांना 'कॅच दी रेन' उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या उपक्रमांतर्गत जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी सर्व विद्यापीठे, कॉलेज प्रशासनांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने आपल्या परिसरात रेन वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर उभारून पाणी पावसाचे झिरपवण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत. रेनवॉटर हार्वेस्टिंग भारतामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस होत असला तरी अनेक भागांमध्ये दरवर्षी दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे दुष्काळी भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे पावसाचे पाणी साठवल्यास विविध भागातील नाले, विहीरी, बोरवेल यांना पाणी लागून दुष्काळी परिस्थितीवर मात करणे शक्य असल्याने यूजीसीने रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प महाविद्यालयीन स्तरावर राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार देशातील सर्व विद्यापीठांना त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांना व शैक्षणिक संस्थांना पावसाळ्यापूर्वी 'कॅच दी रेन' हा उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत.नॅशनल वॉटर मिशन अंतर्गत ही मोहीम राबवण्यात येत आहे. प्रत्येक राज्याला समान पाणी मिळावे असा त्यामागचा उद्देश आहे. पावसाने जोर धरण्यापूर्वीच रेनवॉटर हार्वेस्टींग यंत्रणा उभारा अशा यूजीसीच्या सूचना आहेत. साठवलेल्या पावसाच्या पाण्याचा उपयोग भूगर्भातील पाण्याची स्रोते सक्रीय करण्यास केला जाणार आहे

रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पामुळे जमिनीतील पाण्याचा साठा वाढण्यास मदत होते. त्यामुळे योग्य त्या ठिकाणी पाणी साठवण्यासाठी खड्डा खणणे, छतावर पडणारे पावसाचे वाया जाणारे पाणी खड्ड्यामध्ये साठवणे, पाणवठ्यामधील गाळ काढणे, त्याच्या आसपासचे अतिक्रमण हटवणे, पाणलोट क्षेत्रातून पाणी वाहून नेण्यामध्ये येणारे अडथळे दूर करणे, विहिरींची डागडुजी करणे, मृत बोरवेलला वापरात आणण्यासाठी प्रयत्न करणे अशा विविध पद्धतीने पाणी साठवणे व त्याची जमिनीतील पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना यूजीसीकडून विद्यापीठे व महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. 'कॅच दी रेन' हा उपक्रम पावसाळ्यापूर्वी राबवायचा असून, विद्यार्थ्यांच्या सहभागाने हा उपक्रम राबवण्यात यावे, असेही यूजीसीने स्पष्ट केले आहे.मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्था या निर्णयाची अंमलबजावणी कशी करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.